महाराष्ट्र शासन

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव

GOVERNMENT MEDICAL COLLEGE AND HOSPITAL, DHARASHIV

कोविड-१९ इमारत, जिल्हा रुग्णालय आवार, धाराशिव. (महाराष्ट्र) ४१३ ५०१

e-mail: deangmcosmanabad@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. शावैमवरुधा/सर्जिकल भांडार/ १६९४ /२०२६ — दि.25/ ०८/२०२६

# -: जाहिर नोटीस :-

विषय :- शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथील रुग्णलयातील अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग व मुख्यशस्त्रक्रियागृह विभागास आवश्यक असलेल्या सर्जिकल साहित्याची खरेदीकरीता दरपत्रके सादर करणेबाबत.

संदर्भ :-१. उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक भाखसं- २०१४/.क्र.८२/ भाग-३/उद्योग-४, मंत्रालय, मुंबई, दि.०१.१२.२०१६ रोजीचे शासन निर्णय.

२.उद्योग ऊर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण- २०२१/प्र.क्र.८/ उद्योग-४, दि.०७.०५.२०२१ रोजीचा शासन निर्णय.

३. अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग यांचे दि १३.०८.२०२६,२५/०६/२०२६ व दि. दि.२०/०८/२०२६ रोजीचे मागणीपत्र.

४. मुख्यशस्त्रक्रियागृह विभागाचे १२/०८/२०२६ रोजीचे मागणीपत्र

५. स्त्री रुग्णालय,धाराशिव यांचे दि.२५/६/२०२६ रोजीचे मागणी पत्र

६. या कार्यालयाची दि.२१.८.२०२६ रोजीची मंजूर टिपण्णी.

उपरोक्त विषयान्वये सर्जिकल साहित्य पुरवठादारांस कळविण्यात येते की, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव या संस्थेतील विविध कक्षामध्ये सर्जिकल साहित्याची आवश्यकता असुन त्याची खरेदी करावयाची आहे. करिता इच्छुक पुरवठादारांनी आपले दरपत्रके खालील नमुन्यानुसार बंद लिफाफ्यात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन सादर करावीत.सदर जाहिर सुचना ही सुचना फलक प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**संदर्भ क्र. ४ व ५ अस्थिव्यंगोपचारशास्त्र विभाग व मुख्यशस्त्रक्रियागृह विभाग यांचे मागणी पत्राचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| Sr No | Name Of Item | Unit | Basic Rate | GST extra % |
|---|---|---|---|---|
| १ | Hydrocephalus Shunt System | १ Nox | | |
| २ | Bone Vax | १ Box | | |
| ३ | Ethibond No. २ | १ Box | | |
| ४ | Ethibond No. ५ | १ Box | | |
| ५ | Ioban | १ Nos | | |
| ६ | Merocel Nasel Pack | १ Box | | |
| ७ | Surgicel | १ Box | | |
| ८ | Esmark Bandage No. ४ | १ Nos | | |
| ९ | Esmark Bandage No. ६ | १ Nos | | |
| १० | Ortho Golves No. ६.५ | १ Box | | |

Scanned with CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११ | Ortho Golves No. ७ | १ Box | | |
| १२ | Ortho Golves No. ७.५ | १ Box | | |
| १३ | Ortho Golves No. ८ | १ Box | | |
| १४ | Trup Set | १ Nos | | |
| १५ | Disposable Gowns | १ Nos | | |
| १६ | Hip U drape | १ Nos | | |
| १७ | Knee O drape | १ Nos | | |
| १८ | Suture Retrieval | १ Nos | | |
| १९ | Vaccume Delivery set | १ Nos | | |
| २० | Foetal Doppler Set | १ Nos | | |
| २१ | Transducer Protector | १ Nos | | |
| २२ | Biopolar Cautery pencil with cable | १ Nos | | |

**अटि व शर्ती :-**

१. दरपत्रके दि२७/०८/२०२६ रोजी पासुन ते दि.०४/०९/२०२६ वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यामध्ये या कार्यालयाच्या आवक विभागामध्ये कार्यालयीन वेळेमध्ये स्विकारण्यात येतील व वेळेत न आलेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

२. प्राप्त दरपत्रके दि. ५/०९/२०२६ रोजी ठिक ११:३० वाजता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे उघडण्यात येवुन पुरवठाधारकांनी दिलेले किमान दर मान्य करुन तदनंतर किमान दर असणऱ्या पुरवठाधारकास रुग्णालयाच्या आवश्यकतेप्रमाणेच सर्जिकल साहित्याचे पुरवठा आदेश देण्यात येतील.

३. रुग्णांच्या गरजेनुसार खरेदी (Emergency local purchase) करण्यात येत असल्याने जीवरक्षक व जीवनावश्यक सर्जिकल साहित्याचे या कार्यालयाकडुन पुरवठा आदेश दिल्यानंतर एकुण पुरवठा आदेशाच्या कमीत कमी २५ टक्के सर्जिकल साहित्याचा पुरवठा २४ तासाच्या आत सर्जिकल भांडार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे पुरवठाधारकांनी स्वत: करावा व उर्वरीत शिल्लक साठा व यादीमधील सर्जिकल साहित्याचा पुरवठा तीन दिवसाच्या विहित मुदतीमध्ये सर्जिकल भांडार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव येथे पुरवठाधारकांनी स्वत: करणे आवश्यक आहे. विहीत मुदतीत सर्जिकल साहित्याचा पुरावठा या कार्यालयास प्राप्त न झाल्यास एल २ पुरवठादाराकडुन किंवा स्थानिक बाजरातुन आवश्यकतेनुसार सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येईल. एल २ पुरवठादाराकडुन किंवा स्थानिक बाजारातुन खरेदी केलेल्या सर्जिकल साहित्याची खरेदी किंमत एल १ पुरवठादारापेक्षा जास्त असल्यास सदरील फरकाची रक्कम एल १ पुरवठादाराकडुन वसुल करण्यात येईल.

४. दोन किंवा दोन पेक्षा अधिक पुरवठादारांनी दिलेले दर सर्वात कमी व समान असतील तर सर्वात कमी व समान दर असणाऱ्या विभागुन पुरवठा आदेश देण्यात येतील.

५. पुरवठाधारकाने दरपत्रकासोबत, दुकान परवाना, मुळ संस्थेचे किंवा पुरवठादाराचे पॅनकार्ड, वस्तु व सेवा कर नोंदणी प्रत किंवा लागु नसल्यास त्याबाबतचे घोषणापत्र, संस्थेचे बॅक खाते बाबतचा पुरावा इ. कागदपत्रे जोडावीत.

६. एका पुरावठादारास एकच दरपत्रक सादर करण्याची परवानगी असले. सर्जिकल साहित्याचा देण्यात येणाऱ्या दरपत्रकामध्ये सर्जिकल साहित्याची मुळ किंमत व लागु असलेले कर (जी एस टी) दर्शविण्यात यावे.

Scanned with CamScanner

७. देयकावर वस्तु व सेवा नंबर असणे आवश्यक आहे. वस्तु व सेवा कराशिवाय देयक स्विकारले जाणार नाहीत. आपण सादर केलेल्या मुळ दर व वस्तु व सेवा कराशिवाय इतर कोणत्याही प्रकारचे आगावु खर्च (वाहतुक भाडे/हमाली/डिलीव्हरीने पोहच चे शुल्क) अदा करण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

८. सर्जिकल साहित्याचा पुरवठा वाहतुकी दरम्यान तुट फुट/खराब झाल्यास विना विलंब बदलुन देणे बंधनकारक राहील.

९. तसेच सदरील सर्जिकल साहित्याची देयके वरीष्ठ कार्यालयाकडुन जसे अनुदान प्राप्त होईल त्याप्रमाणे अदा करण्यात येईल.

१०.पुरवठाधारकांनी पुरावठा केलेली सर्जिकल साहित्य अप्रमाणित अथवा खराब असल्यास या कार्यालयाने मान्य केलेल्या दरानुसारच विनाविलंब बलदुन देणे बंधनकारक राहील.

११.कोणतेही कारण न देता प्राप्त दरपत्रकापैकी कोणतेही दरपत्रक स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा व दरपत्रक प्रक्रिया कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखुन ठेवला आहे

१२.यादीमधील सर्व सर्जिकल साहित्य दर्शविलेल्या संख्येनुसार खरेदी करणे बंधनकारक राहणार नाही.

१३.प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास व्याज देय राहणार नाही.

१४. सदर दरपत्रक हे मंजूर दिनांकापासून पुढील सहा महिन्यासाठी वैध राहतील.

१५.देयके सादर करताना लिफाफा सीलबंद करुन सादर करावेत.

**१६. सदरील साहित्य पुरवठाकरते वेळी** ISO 9001, 45001, 14001, 13485, CE, GMP, **NABL,** NABCB, ZED (Minimum Bronze), IEC, Form MD-42, TUY,CDSCO certificates required as per tender requirement.इ. **प्रमाणपत्रे पुरवठा करणे बंधनकारक आहे.**

**१७.पुरवठा करण्यात येणारे सर्जिकल साहित्य हे** ISI MARK /ISO MARK **किंवा त्याच्याशी समतुल्य असेलेले असावे.**

१८. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव हे कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्यावर पुरवठादार निवडप्रक्रिया थांबविण्याचा किंवा रदद करण्याचा अधिकार राखून ठेवत आहेत.

(डॉ.शैलेंद्र द.चौहान)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय, धाराशिव

प्रत :-

१. सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव.
२. इन्दुजा फार्मा, धाराशिव.
३. ओसिया फार्मा,नागपूर
४. पर्व आयुर्वेदिक अँड जेनेरीक,लातूर
५. बालाजी सर्जिकल, धाराशिव
६. नितीन फार्मा ॲण्ड सर्जिकेअर,धाराशिव

Scanned with CamScanner